# ३. विद्यानिकेतन शाळा चालविण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना सहाय्यक अनुदान योजना

महाराष्ट्रातील विजाभज विद्यार्थ्यांना निवासी शिक्षणाचा फायदा मिळावा आणि त्यांची शैक्षणिक सामाजिक व आर्थिक उन्नती व्हावी या उद्देशाने सन १९५३ पासून आश्रमशाळा योजना अंमलात आणली. तथापि विजाभज जमातीतील होतकरु व हुशार गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र विद्यानिकेतन योजना शासन निर्णय क्रमांक व्हीएएस/१०९०/प्र.क्र.१३५/ मावक–६ दिनांक ०६/११/१९९५ अन्वये स्वयंसेवी संस्था मार्फत विद्या निकेतन सुरू करण्यास मंजुरी दिली व शासन निर्णय दिनांक ३१/७/१९९६ अन्वये विमुक्त जाती सेवा समिती वसंतनगर कोटग्याळ, ता. मुखेड जि. नांदेड या स्वयंसेवी संस्थेस विद्यानिकेतन सन–१९९६–९७ पासून सुरू करण्यास मंजूरी देण्यात आली. सध्या कार्यरत असलेल्या विद्यानिकेतन मध्ये इयता ५ वी ते १२ वी पर्यत वर्ग सुरु असून ६४० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

- **सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी संपर्क :–** **सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, नांदेड**
- **शासन निर्णय क्रमांक :–** **व्हीएएस/१०९०/प्र.क्र.१३५/ मावक–६ दिनांक ०६/११/१९९५ सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभाग**